


सुरमयी सुरैया

१९४१च्या ताजमहलमध्ये बालकलाकार म्हणून काम करणाऱ्या सुरैयाने तेराव्या वर्षी शारदा चित्रपटात महेताबसाठी पहिल्यांदा पार्श्वगीत गायलं. त्यावेळी तिची उंची इतकी कमी होती की, माईकसमोर उभं राहून गाण्यासाठी संगीतकार नौशादनी तिला एका स्टुलावर उभं केलं होतं. अनमोल घडी, दिल्लगी(जो ४० वेळा पाहिल्याचा दावा धर्मेंद्र करतो.) सारख्या चित्रपटांतून ४०च्या दशकात इंडस्ट्रीत टॉपवर राहिलेली सुरैयाची कारकीर्द नंतर अचानक ढळू लागली. ५०च्या दशकात वारीस आणि मिर्झा गालिब या दोन चित्रपटांत तिने अप्रतिम भूमिका साकारली. १९६३मध्ये शेवटच्या रुस्तम सोहराबमध्ये तिने गायलेलं गीत होतं - 'ये कैसी अजब दास्तां हो गयी है...' बस, त्यानंतर तिने या क्षेत्राला अलविदा म्हटलं.

सौजन्य: फेमिना